


कोल्हापूर : 'सहकाराचा विकास' या पुस्तकाचे प्रकाशन करताना जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी. सोबत डॉ. रूपा शहा व इतर.

# डॉ. शहा सहकारविषयक पुस्तकांचा रौप्यमहोत्सव साजरा करतील : डॉ. सैनी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

प्रा. डॉ. रूपा शहा सहकारविषयक अभ्यासक्रमाच्या पुस्तकांचा रौप्यमहोत्सव साजरा करतील, अशी अपेक्षा जिल्हाधिकारी डॉ. अमितकुमार सैनी यांनी नुकतीच 'सहकाराचा विकास' या पुस्तकाच्या प्रकाशन कार्यक्रमात बोलताना व्यक्त केली. या कार्यक्रमास डॉ. पी. ए. कोळी, प्रा. हेमंत पाटील यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

महावीर महाविद्यालयात 'सहकाराचा विकास' या विषयाच्या सुधारित अभ्यासक्रमाबाबतची कार्यशाळा नुकतीच पार पडली. यावेळी महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. रूपा शहा व सोलापूरचे डॉ. बी. एच. दामजी यांनी बी. कॉम. भाग ३ च्या अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांसाठी लिहिलेल्या 'सहकाराचा विकास' या नव्या पुस्तकाचे प्रकाशन जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते झाले. फडके प्रकाशनने या पुस्तकाचे प्रकाशन केले आहे. प्रकाशन समारंभावेळी मंदार फडके यांचीही उपस्थिती होती.

प्रारंभी प्रा. डॉ. शहा यांनी पुस्तकाच्या लेखनामागील भूमिका व सहकार चळवळ सुदृढ राहण्याची आवश्यकता, या विषयी आपले विचार मांडले. यावेळी प्रा. डॉ. सुभाष दगडे, प्रा. डॉ. पी. ए. कोळी, प्रा. डॉ. दिनकर मोरे यांची उपस्थिती होती.